**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 173 B.N.S.S)**

# प्रथम खबर अहवाल
**(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)**

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** अक्कलकोट उत्तर **Year (वर्ष):** 2025

   **FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0136 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/03/2025 22:45 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

   1 **Day (दिवस):** गुरूवार **Date from (दिनांक पासून):** 20/03/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 20/03/2025

   **Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 11:45 तास **Time To (वेळेपर्यंत):** 13:20 तास

   (b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 20/03/2025 **Time (वेळ):** 21:20 तास

   (c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 035 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 20/03/2025 22:36 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 4 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

      **(b) Address (पत्ता):** उपअधीक्षक भूमि,अभिलेख कार्यालय अक्कलकोट,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** रमेश शिवशंकर नरूणे

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1980 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | करजगी, ता अक्कलकोट जि सोलापूर, अक्कलकोट दक्षिण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | करजगी, ता अक्कलकोट जि सोलापूर, अक्कलकोट दक्षिण, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9420780960

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश भागवत घाडगे | | | 1. Town/Village (शहर / गाव): उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): अक्कलकोट उत्तर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 6000 रु रोख रक्कम | 6,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 6,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.20.03.2025

मी रमेश शिवशंकर नरूणे, वय- 45 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. करजगी, ता. अक्कलकोट जि. सोलापूर मो.नं. 9420780960 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून, माझ्या नावे करजगी गावात गट नं. 515 व गट नं. 516 येथे वडिलोपार्जित जवळपास एकूण 34 एकर शेतजमीन आहे. सदर शेतजमीन

मी सोलार प्लँटसाठी भाडेतत्तावर दयायचे ठरविले होते. सदर सोलार प्लॅन्टसाठी शेतजमीनीचे गावनकाशा, स्किम उतारा, गटनकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल या कागदपत्रांची आवश्यकता असल्याने मी माझे गट क्र. 515 व 516 येथील शेतजमीनीच्या संदर्भात गाव नकाशा मिळण्यासाठी एक अर्ज तसेच स्किम उतारा, गटनकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल मिळण्यासाठी एक स्वतंत्र अर्ज असे दोन अर्ज शासकिय तिकिट लावून उप अधीक्षक भूमि अभिलेख, अक्कलकोट कार्यालय येथे दि.10/3/2025 रोजी जाऊन तेथील आवक जावक कामकाज पाहणा-या महिला कर्मचारी यांना भेटून दोन्ही अर्ज दिलो असता, त्यांनी त्या दुस-या कामात व्यस्त असल्याने माझे अर्ज न घेता ते महेश घाडगे यांना भेटून देण्यास सांगितले, त्यावेळी मी महेश घाडगे यांना भेटून माझे दोन्ही अर्ज दिले व सदर अर्जाचे नमुद उतारे लवकरात लवकर मिळण्याची विनंती केली. त्यावेळी महेश घाडगे यांनी मला नमुद उतारे व नक्कलांसाठी रु.6000/- दयावे लागतील असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना सदरची रक्कम शासकिय फि आहे का याबाबत विचारणा केली असता, त्यांनी शासकिय चलनाची जी काही फि असेल त्याचे पाचशे ते हजार रुपये ते वेगळे परस्पर बँकेत भरावे लागेल असे सांगितले. मी दिलेले अर्ज त्यांनी स्वत:जवळ ठेवून घेतले व मला सहा हजार आणुन देण्यास सांगितले.

त्यानंतर दि.19/03/2025 रोजी मी उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय अक्कलकोट येथे जावून महेश घाडगे यास भेटून मी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने उतारे तयार झाले का याबाबत विचारणा केली असता, त्याने मला रु. 6000/- आणले का असे विचारणा करुन पैसे दिल्याशिवाय माझे अर्ज पुढे पाठवणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे मी सायंकाळी 06.00 वाजण्याचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे येवून माझे गट क्र. 515, 516 या शेतजमीनीचे गाव नकाशा, स्किम उतारा, गटनकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल हि कागदपत्रे/नक्कला देण्यासाठी उप अधीक्षक भूमि अभिलेख, अक्कलकोट कार्यालय येथील महेश घाडगे हे माझ्याकडे रु.6000/- लाचेची मागणी करत असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी उदया सकाळी पडताळणी कारवाई करण्यासाठी अक्कलकोट येथे येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर आज दि.20/03/2025 रोजी पोनि पिंगुवाले यांनी मला संपर्क करून त्यांचे पथकासह सोलापूर गाणगापूर रोडवरील अक्कलकोट येथे जाणा-या रोडच्या ब्रिजखाली येऊन माझी भेट घेतली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्यासोबत असलेल्या दोन शासकीय पंचांची व माझी आपसात ओळख करून दिल्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरवेळी मी गट क्र. 515, 516 या शेतजमीनीचे गाव नकाशा, स्किम उतारा, गटनकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल हि कागदपत्रे/नक्कला देण्यासाठी दिलेल्या दोन्ही अर्जाच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडून दिल्या. त्यावर पोनि पिंगुवाले व पंचानी सह्या केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि. पिंगुवाले यांनी मला श्री महेश घाडगे यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, त्यांची उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे भेट होईल असे मी सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये त्यामध्ये यापुर्वी कोणतेही रेकॉर्डींग नसल्याचे खात्री करून दिली आणि व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवून

मला महेश घाडगे यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 यांच्यासह माझे मोटार सायकल क्र. एमएच 13 एक्स 5193 स्पेलंडर प्लस यावरुन 11.45 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट या कार्यालयात जावून महेश घाडगे यांची भेट घेतली, त्यावेळी मी त्यांना नमस्कार ओ..महेश साहेब असे सांगून कामाबाबत विचारणा केली, चर्चेदरम्यान मी त्यांना नक्कलांबाबत विचारणा केली असता, त्यांनी आणि ह्याला शोधायला टायम लागतय..तुमला फी तेवढी सांगितलेली द्या म्हणलेल तुम्ही काय तर असे बोलून यापुर्वी मागणी केलेल्या लाच रक्कमेबबात विचारले, त्यावर मी त्यांना चलनाबाबत विचारणा केली असता, त्यांनी अओ फी.. शोधाव लागतय..चलन ह्याज गाव नकाशाच चलन काढुन तुमी 458 च भरुन या..माझं जंबोच द्या..असे बोलून चलनाची रक्कम 458/- रुपये मला भरावे लागतील असे सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान घाडगे यांनी सांगितल की तुम्हाला चार-पाच हजार रुपये..पाच-सहा हजार रुपये..चार-पाच हजाराच्या आसपास जाईल सगळं आमच्यासहीत असे बोलून लाच रक्कमेची मागणी केली, त्यावेळी मी त्यांना पाच-आणु का सहा आणु..असे विचारले असता, त्यांनी सहा आणा सहा.. असे बालून रुपये 6000/- लाचेची मागणी केली. त्यावेळी त्यांनी चलन काढून देतो तुम्ही चलन भरुन या..आण मला द्या..एक दोन तुम्ही..तुमाला चलन..बाकीच रेकॉर्ड काढायला टायम लागल..मी काढतो.. असे बोलून मला पैसे घेवून येण्यास सांगून आज गाव नकाशा देणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवून वरील हकिगत सांगितली.

सदर पडताळणी कारवाईदरम्यान महेश घाडगे यांनी माझ्याकडे 6,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पिंगुवाले यांनी महेश घाडगे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेले 6,000/- रू. रक्कमेच्या नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या पॅन्टच्या पाठीमागच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र.1 असे दोघांना माझ्या मोटार सायकलवरुन महेश घाडगे यांची भेट घेण्याकरीता 12.50 वाजता रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट या कार्यालयाजवळ असणा-या इंडियन मॉडेल स्कूलजवळ शासकिय वाहन थांबवून ते पायी चालत येऊन कार्यालयाच्या आवारात कामानिमित्त आलेल्या लांकाच्यामध्ये कोणास संशय येणार नाही असे तसेच काहिजण कार्यालयाच्या गेटच्या बाहेर सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र. 1 असे दोघे उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट या कार्यालयत जावून घाडगे यांची भेट घेतली त्यावेळी आमच्यात नक्कल व चलनाबाबत चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान घाडगे यांनी पाचशे रूपये द्या.. बाकीच मग तुमच काय असेल ते फी द्या.. चलनासहीत भरून टाकतो मग आमच्या आम्ही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाही सगळच करून द्या असे सांगितले. त्यावर त्यांनी सगळच देतो असे सांगून सर्व कागदपत्रांच्या नकला देणार असल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना किती देऊ आता? असे सांगितले. त्यावेळी त्यांनी द्या कि तुम्ही

म्हणलेल तेवढ.. असे बोलून रु. 6000 लाच रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझ्या खिशातील लाच रक्कम काढून त्यांच्या समोर धरली असता त्यांनी किती हायत असे विचारले, त्यावेळी मी त्यांना सहा आहे बघ असे सांगितले असता त्यांनी ठिक हाय असे बोलून लाच रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेऊन घेतले. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे डोक्यावरील टोपी काढून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा दिला. त्यावेळी आमच्या समोर थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथक आत येवून पोनि पिंगुवाले यांनी महेश घाडगे यास ताब्यात घेतले आणि पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी घाडगे यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महेश भागवत घाडगे, वय 32 वर्षे, पद- शिपाई, उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट, राहणार- शेवणे ता. सांगोला, जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी घाडगे यांचे ताब्यातून स्विकारलेली लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत केली आणि सदर ठिकाणी सापळ्यातील प्राथमिक तपासण्या कार्यालायातील संगणक कक्षामध्ये करण्यात आल्या. त्यानंतर महेश घाडगे यांना ताब्यात घेवून सापळा कारवाई झालेबाबत संतोष पुंडलिक बिराजदार, मुख्यालय सहाय्यक, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट यांना व श्री शैलेंद्र शिगणे, उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी आज दि.20/03/2025 रोजी 11.45 ते 13.20 वा चे दरम्यान लोकसेवक श्री महेश भागवत घाडगे, वय 32 वर्षे, पद- शिपाई, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय अक्कलकोट, राहणार- शेवणे ता. सांगोला, जि. सोलापूर यांनी माझे गट क्र. 515, 516 या शेतजमीनीचे गाव नकाशा, स्किम उतारा, गटनकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल हि कागदपत्रे/नक्कला देण्यासाठी स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन माझ्याकडे रु. 6000/- लाचेची मागणी रुपये 6,000/- लाच रक्कम स्वत: स्विकारून बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** PANDURANG RAWSAHEB PAWAR **Rank (हुद्दा):** पोलीस उपनिरीक्षक

**No. (क्र.):** DGPPRPM8705 **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):** **or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** RAJENDRA RANGNATH TAKANE

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PBMH79447

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्‌दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल् या/पाहिलेल् या) शारीरिक वैशिष् टये, व् यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन् मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच् या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1993 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व् यंग वैशिष् टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच् य सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल् याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त् यापेक्षा अधिक तपशील दिल् यास फक् त यातील रकान् यांची नोंद घेतली जाईल)**